# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.

नागपूर विभाग, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर-४४० ००१

दूरध्वनी क्रमांक : ०७१२-२५६५९४३ E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in

कार्यालयीन आदेश : क्र.तशिस/विकाना/आस्था/बदली/२०१९/ 68

दिनांक : 29/05/2019

पहा : १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम- दिनांक ११ मे २००६

२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग अधिसुचना दिनाक २८ मे २०१५

३) सामान्य प्रशासन विभाग शा नि क्र एसआरव्ही-२०१७/प्रक ४१५/कार्यासन १२ दिनाक ९/४/२०१८

संदर्भिय शासन अधिनियमातील तरतूदी विचारात घेवून सहा वर्षाचा कालावधी पुर्ण करणा-या कर्मचा-यांचा बदलीचा प्रस्ताव नागरी सेवा मंडळासमोर सादर करण्यात आला होता. नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीस अनुसरुन सक्षम प्राधिका-यानी दिलेल्या पूर्व मान्यतेनुसार सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर हे त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्थ संस्था/कार्यालयातील गट-क मधील (तांत्रिक / अतांत्रिक) पदावरील खालील कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी विनंती/प्रशासकीय कारणास्तव विभागांतर्गत बदली करण्यात येत असून स्तम ३ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव, पदनाम व कार्यरत संस्था | बदलीचे ठिकाण व प्रकार |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | भांडारपाल | |
| ०१ | श्री बलीराम परसराम जाधव<br>शासकीय तंत्रनिकेतन नागपूर | शासकीय तंत्रनिकेतन ब्रम्हपुरी येथे रिक्त असलेल्या भांडारपाल या पदावर प्रशासकीय बदली |

उपरोक्त कर्मचाऱ्यानी बदली करण्यात आलेल्या संस्थेत / कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे. ज्या कर्मचाऱ्याची बदली त्यांच्या विनंतीवरुन करण्यात आलेली आहे त्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासखर्च, पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही तसेच ज्या कर्मचा-यांची प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आलेली आहे त्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी नियमानुसार प्रवासखर्च, पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील. अनुज्ञेय पदग्रहण अवधी न घेता रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचा असा कालावधी म.ना.से. नियम १९८१ (पदग्रहण अवधी) मधील नियम १५(२) नुसार अर्जित रजा म्हणून त्यांच्या रजा खाती जमा करण्यात याव्यात.

बदली झालेल्या कर्मचा-यांनी त्यांची बदली रद्द करणे अथवा त्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या दबाव आणलयास संबधितांची कृती गैरवर्तणुक समजण्यात येईल.

बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर सर्व कार्यालयांनी पर्यायी कर्मचारी हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या कर्मचा-यांना दिनांक ३१/०५/२०१९ (म.न.) पर्यंत कार्यमुक्त करावे व संबधीत कर्मचा-यांचे दिनांक १/६/२०१९ पासूनचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपूर्व कार्यालयाने आहरित करु नये

(अ. चंद्रशेखर थोरात)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

१) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीकरीता सादर. (कार्यासन क्र. १२)
२) कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय/उपकोषागार कार्यालय, ब्रम्हपुरी (मानार्थ) (संबंधित कार्यालय / संस्था प्रमुखांमार्फत)
३) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर/ब्रम्हपुरी/
४) संबंधित कर्मचारी (संबंधित कार्यालय / संस्था प्रमुखांमार्फत)
५) निवड नस्ती